Annexure VII(2),(Vide Article-7.03.02)

२५.

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय परिचर्या) नियम १९६१. आकस्मिक आजारासाठी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या **औषधोपचारांच्या खर्चाची प्रतिपूर्ती.**

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग,
परिपत्रक क्र. एमएजी १०८१/ ४९०७/ आरोग्य -९.
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.

**दिनांक : १५ ऑक्टोबर १९८५.**

**वाचा-** शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रः एमएजी १०८१/४९०७/ आरोग्य-९, दिनांक १९.१०.८३.

**परिपत्रक** - निरनिराळ्या कार्यालयात वैद्यकीय प्रतिपूर्तीची बिले लवकर काढली जात नाहीत अशा तक्रारी आल्या आहेत. त्या करिता जी कारणे आहेत त्यामध्ये शासकीय आदेशांची नीट माहिती नसणे हे प्रमुख कारण आहे. तसेच निरनराळ्या आदेशांच्या प्रती उपलब्ध नसतात. असेही समजते. या सर्व आदेशांची माहिती एकत्रीत केली असून व त्याचा मराठी अनुवाद करण्यात येत असून लवकरंच पुस्तक रुपाने सर्व कार्यालयांना पुरविण्यात येणार आहे.

२. कांही बाबतीत पुढील प्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

(१) ११.१०.८३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ७ नुसार देयक मंजूर करण्याचे अधिकार उप संचालक, आरोग्य सेवा यांना दिलेले आहेत. उपसंचालक, आरोग्य सेवा हे वैद्यकीय अधिकारी आहेत व आजाराचे निदान व गांभीर्य ते योग्यरीत्या जाणू शकतात. म्हणून त्यांचे अभिप्राय हे अंतिम मानण्यात यावेत.

(२) ११.१०.८३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ मध्ये जे दर दर्शविले आहेत, ते शासकीय रुग्णालयातील ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक दिवसाचे दर आहेत व शासकीय कर्मचाऱ्यास शासकीय रुग्णालयात स्पेशल नर्सिंग होम मध्ये दाखल केले असता, सदर दरांच्या ५०% दर भरावे लागतात. त्याच आधारावर खाजगी रुग्णालयात राहण्यासाठी म्हणजे कॉट चार्जेससाठी जो खर्च येतो, त्या खर्चाची प्रतिपूर्ती देताना शासकीय कर्मचाऱ्याने स्वतः सोयावयाची १०%, १५%, व २०% रक्कम ही जर शासकीय दरांच्या ५०% रकमेपेक्षा कमी असेल, तरच हा प्रश्न निर्माण होईल.

उदाहरणार्थ : एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याचे मासिक वेतन ५५० रु. असेल व त्याला हॉस्पिटलमध्ये राहण्यासाठी प्रतिदिनी ८५ प्रमाणे ३ दिवसांसाठी २५५ खर्च आला असेल तर त्याला सदर खर्चाची प्रतिपूर्ती खालीलप्रमाणे देता येईल.

| खर्च केलेली रक्कम | शासकीय दराने वसूल करावयाची ५०% रक्कम | देय असलेली रक्कम |
|---|---|---|
| रु २५५<br>(८५ X ३) | रु. ६०<br>(२० X ३) | रु. १९५<br>(२५५ - ६०) |

या ठिकाणी हॉस्पीटलायझेशनच्या खर्चाच्या म्हणजे २५५ च्या १० % रक्कम रु. २५.५० आहे व ही रक्कम ६० रु. पेक्षा नर्सिग होम चार्जेस च्या ५०% रकमेपेक्षा कमी आहे. जर ही १०% रक्कम (शासकीय कर्मचाऱ्याने स्वतः सोसावयाची ) जास्त असली तर आहे. जर ही १०% रक्कम (शासकीय कर्मचाऱ्याने स्वतः सोसावयाची ) जास्त असली तर वरीलप्रमाणे शासकीय दराने वसुली करण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. अशा परिस्थितीत हॉस्पिटललायझेशनच्या खर्च प्रतिपूर्ती वेतनमानानुसार ८०%, ८५%, व ९०% या प्रमाणातच देण्यात यावी. ज्या शासकीय कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन रु ३०० अथवा त्यापेक्षा कमी असेल त्याला शासकीय रुग्णालयात स्पेशल नर्सिग होमसाठी चार्ज आकारला जात असल्यामुळे अशा शासकीय कर्मचाऱ्यांस हॉस्पिटलायझेशनच्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती मिळेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्रभाकर भगरे)

कार्यासन अधिकारी